## आजचे पंचांग

गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, चतुर्दशी रात्री ८-१२ पर्यंत, दिवस नक्षत्र- उत्तराभाद्रपदा दुपारी १-५९ पर्यंत नंतर रेवती
चंद्र रास - मीन, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

## वर्ध्यात शाळांना सुट्टी

**वर्धा:** राज्यात तापमानात मोठी वाढ होत असून उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभाग यांनी दिलेल्या अंदाजानुसार अर्ध्या महाराष्ट्रात हीट वेव्हची परिस्थिती निर्माण होऊ शकते. या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्हा प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना १६ एप्रिल रोजी सुट्टी देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगण्यात आले.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. १६ एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - २०१ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### कोचीमध्ये अंमली पदार्थ जप्त

**कोची :** उत्पादन शुल्क विभागाने एका व्यक्तीला अटक करून त्याच्याकडून १४२ ग्रॅम एमडीएमए आणि चार ग्रॅम हॅशिश तेल जप्त केले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची ओळख रशीद असून तो मलप्पुरमचा रहिवासी आहे. उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी पहाटे कोचीमधील पल्लुरुथीजवळ त्याच्या ताब्यातून अमली पदार्थ जप्त करण्यात आले.

### विस्थापित काश्मिरी पंडितांचे आंदोलन

**जम्मू :** काश्मिरी पंडितांनी बुधवारी जम्मूमध्ये निदर्शने केली. प्रति कुटुंब १३,००० रुपयांच्या सध्याच्या कमाल मर्यादेतून दुप्पट मासिक मदत देण्याची मागणी त्यांनी केली. गेल्या आठ वर्षांपासून प्रशासनाने या मदतीत सुधारणा केलेली नाही, असा आरोप त्यांनी केला. रवींद्र कौल यांच्या नेतृत्वाखाली, मोठ्या संख्येने आंदोलक जम्मू येथील प्रेस क्लबमध्ये जमले आणि वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर मदत वाढवण्याची मागणी करत घोषणाबाजी केली. गेल्या आठ वर्षांपासून महागाईत प्रचंड वाढ होऊनही मदतीत कोणतीही वाढ झालेली नाही.

### यूट्युबरची याचिका फेटाळली

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने, युट्युबर आणि पत्रकार सावुक्कू शंकर यांच्या तामिळनाडू गुंडा कायद्याअंतर्गत केलेल्या प्रतिबंधात्मक अटकेला आव्हान देणारी याचिका सुनावणीसाठी फेटाळून लावली आणि याचिकाकर्त्याला मद्रास उच्च न्यायालयात दाद मागण्याचे निर्देश दिले. न्यायमूर्ती दिपांकर दत्ता आणि सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी केली.

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे लोकप्रतिनिधी तसेच नेत्यांना पत्र

# महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा द्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील आणि राष्ट्रीय पातळीवरील राजकीय घडामोडींना वेग आला असून, देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील लोकसभा व राज्यसभेतील सर्व खासदारांना पत्र पाठवून या विधेयकाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. या पत्रामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पाठवलेल्या पत्रामध्ये विविध पक्षांतील नेत्यांचा समावेश असून, त्यात उद्धव ठाकरे, हर्षवर्धन सपकाळ, शशिकांत शिंदे आणि सुनील तटकरे यांसारख्या नेत्यांचा उल्लेख आहे. या पत्रातून "महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा द्या आणि या ऐतिहासिक निर्णयाचे साक्षीदार व्हा," असे स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ही पत्रे दोन दिवसांपूर्वी संबंधित खासदारांना पाठवण्यात आली आहेत.

दरम्यान, केंद्र सरकारने महिला आरक्षणाची अंमलबजावणी लवकर करण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. १६ ते १८ एप्रिल दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले असून, त्यामध्ये या विधेयकावर सविस्तर चर्चा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही सर्व राजकीय पक्षांनी एकमताने हे विधेयक मंजूर करावे, असे आवाहन केले आहे. त्यामुळे या अधिवेशनाकडे देशभराचे लक्ष लागले आहे.

महिला आरक्षणाशी संबंधित 'नारी शक्ती वंदन कायदा' २०२३ मध्ये मंजूर झाला होता. आता त्यात काही सुधारणा करून तो २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी लागू करण्याचा प्रयत्न सुरू आहे. प्रस्तावित बदलांनुसार लोकसभेच्या एकूण जागांची संख्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये ८१५ जागा राज्यांसाठी तर ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी राखीव असतील.

या प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे मतदारसंघांची पुनर्रचना (डिलिमिटेशन) होय. त्यानुसार नव्याने मतदारसंघांची आखणी करून महिलांना लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये ३३ टक्के आरक्षण देण्याचा मुख्य उद्देश आहे. ही प्रक्रिया गतीमान करण्यासाठी केंद्र सरकार तीन स्वतंत्र विधेयके सादर करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, या घडामोडींवर विरोधकांकडून टीकाही सुरू झाली आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी संसदेचे विशेष अधिवेशन घाईघाईने बोलावल्याचा आरोप केला आहे. तसेच, आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. सुरुवातीला महिला आरक्षणाची अंमलबजावणी २०३४ पासून करण्याचा विचार होता, मात्र काँग्रेसने ते लवकर लागू करण्याची मागणी केली होती, असेही त्यांनी नमूद केले. महिला आरक्षणाचा मुद्दा आता सामाजिक किंवा धोरणात्मक न राहता, तो वादाचा केंद्रबिंदू बनत आहे.

# सुनेत्रा पवार यांनाच प्रचंड पाठिंबा मिळेल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असताना रोहित पवार यांनी सुनेत्रा पवार यांच्या विजयाबाबत ठाम दावा केला आहे. सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उभे असलेले उमेदवार बाहेरचे असून त्यांना अत्यल्प मतदान मिळेल, असे सांगताना त्यांनी "जास्तीत जास्त मतदान झाले, तर त्यातील ९९ टक्के मतदान सुनेत्रा काकींनाच मिळेल," असा विश्वास व्यक्त केला.

प्रचारादरम्यान पत्रकारांशी बोलताना रोहित पवार म्हणाले की, बारामतीत विविध स्तरांवर प्रचार सुरू असून प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने मतदारांपर्यंत पोहोचत आहे. २३ तारखेला मतदान होणार असल्याने वेळ कमी असून विविध भागांत व्यापक प्रचार करण्यावर भर दिला जात आहे. "त्यांचा प्रचार वेगळ्या पद्धतीने सुरू आहे, तर आमचा वेगळ्या बाजूने सुरू आहे. कुटुंबातील सदस्यही आपापल्या पातळीवर काम करत आहेत," असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी अजित पवार यांच्याबद्दल जनतेत असलेले प्रेम आणि आदर हेच या निवडणुकीतील प्रमुख घटक असल्याचे सांगितले. "अजितदादांनी अनेकांना राजकारणात आणले, सामाजिक आणि वैयक्तिक पातळीवर मदत केली. त्यामुळे लोक कर्तव्यभावनेतून प्रचार करत आहेत," असे ते म्हणाले.

सुनेत्रा पवार यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्ता प्रयत्नशील असल्याचे सांगत, या निवडणुकीत जनतेचा स्पष्ट कौल त्यांच्या बाजूने लागेल, असा विश्वास रोहित पवार यांनी व्यक्त केला.

# अधिकाऱ्यांच्या बदल्या सुरूच

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा सिलसिला कायम ठेवत बुधवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पाच वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले. मागील दोन आठवड्यांतील ही तिसरी मोठी बदली आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर कॅबिनेट बैठकीच्या आसपास अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याची परंपरा सुरूच असल्याचे दिसून येत आहे. दर आठवड्याला आठ ते दहा अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी होत असल्याने प्रशासनात सातत्याने हालचाल सुरू आहे.

डॉ. बी. एन. पाटील यांची संचालक, पर्यटन, मुंबई या पदावरून प्रकल्प संचालक, 'रुसा' येथे बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी मंगेश जोशी यांची यशदा, पुणे येथील उपमहासंचालक पदावरून संचालक, पर्यटन, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कुलदीप जंगम, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांची अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका येथे बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी कुशल जैन, प्रकल्प अधिकारी (आयटीडीपी), अहेरी यांची सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती झाली आहे. रेवैया डोंगरे, सहायक जिल्हाधिकारी, भूम (धाराशिव) यांची प्रकल्प अधिकारी, आयटीडीपी, पांढरकवडा तसेच सहायक जिल्हाधिकारी, केळापूर (जि. यवतमाळ) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### ९३.७० टक्के उत्तीर्ण, मुलींची पुन्हा बाजी

# सीबीएसई दहावीचा निकाल जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड (सीबीएसई) यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला असून, यंदा एकूण निकाल ९३.७० टक्के लागला आहे. गेल्या वर्षीच्या ९३.६६ टक्क्यांच्या तुलनेत यंदा निकालात किंचित वाढ झाली आहे. विशेष म्हणजे, उत्तरपत्रिकांची तपासणी विक्रमी वेळेत पूर्ण करत बोर्डाने यंदाचा निकाल नेहमीपेक्षा सुमारे एक महिना आधी जाहीर केला आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनी उत्तीर्णतेच्या टक्केवारीत मुलांपेक्षा आघाडी घेतली आहे. त्यामुळे निकालात मुलींचे वर्चस्व कायम राहिले आहे. यंदा सुमारे २४ लाख ७१ हजार ७७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी २३ लाख १६ हजार ८ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. सीबीएसईकडून यंदाही अधिकृत टॉपर यादी जाहीर करण्यात आलेली नाही; मात्र विविध विषयांत उच्च गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

परीक्षेत अपयशी ठरलेल्या किंवा मिळालेल्या गुणांवर असमाधानी असलेल्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या परीक्षेची संधी देण्यात आली आहे. १५ मेपासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेसाठी अर्ज करता येणार असून, यासंदर्भातील सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर होणार आहे. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार सीबीएसईने दोन बोर्ड परीक्षा पद्धतीचा अवलंब केला आहे.

विभागनिहाय निकालात त्रिवेंद्रम आणि विजयवाडा विभागांनी ९९.७९ टक्के निकालासह अव्वल स्थान पटकावले आहे. त्यानंतर केंद्रीय विद्यालयांचा निकाल ९९.५७ टक्के, तर जवाहर नवोदय विद्यालयांचा निकाल ९९.४२ टक्के लागला आहे. दिल्ली विभागाचा निकाल ९७.३८ टक्के असून, नोएडा विभाग ८७.६६ टक्क्यांसह मागे राहिला आहे. सरकारी शाळांचा एकूण निकाल ९१.४३ टक्के नोंदवण्यात आला आहे. परीक्षा १७ फेब्रुवारी ते १० मार्च २०२६ या कालावधीत घेण्यात आली होती. निकालातील सातत्यपूर्ण उच्च टक्केवारी आणि प्रक्रिया वेगवान केल्यामुळे सीबीएसईच्या कार्यपद्धतीबद्दल समाधान व्यक्त केले जात आहे.

### विदर्भासह अनेक भागांना यलो अलर्ट, १८ पासून अवकाळीचा इशारा

# महाराष्ट्रात उष्णतेच्या कडाक्यात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** राज्यात सध्या उष्णतेची तीव्र लाट उसळली असून बहुतांश भागांमध्ये तापमानाने चाळीशी ओलांडली आहे. विदर्भ, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकणातील अनेक जिल्ह्यांमध्ये उन्हाचा चटका वाढला असून पुढील दोन ते तीन दिवस परिस्थिती अधिक तीव्र राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

विदर्भात अकोला येथे सर्वाधिक ४४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. अमरावती (४३.८) आणि वर्धा (४३.५) येथेही तापमान उच्चांकावर पोहोचले आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण विदर्भाला पुढील दोन दिवस 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. तसेच जळगाव (४२.५) आणि परभणी (४२.१) येथेही तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे.

दक्षिण महाराष्ट्रातील सोलापूर, सांगली तसेच कोकण किनारपट्टी आणि गोवा परिसरातही उष्णतेची लाट कायम राहणार असल्याने या भागांनाही 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. शहरांसह ग्रामीण भागातही दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत असल्याचे चित्र दिसत आहे. रखरखत्या उन्हातून काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता असून १८ एप्रिलपासून राज्यात अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मराठवाडा, विदर्भ आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रात मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो. या पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. उष्णतेपासून बचावासाठी नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, हलके व सुती कपडे परिधान करावेत तसेच भरपूर पाणी पिण्याची सवय ठेवावी. प्रवास करताना पाण्याची बाटली, टोपी आणि छत्री सोबत ठेवण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.

### राज्यात उष्माघाताचा पहिला बळी?

**अकोला :** राज्यात उन्हाचा तडाखा आता जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्र होरपळला असून उन्हामुळे अंगाची लाही लाही होत आहे. तापमानाचा पारा वाढत आहे. अकोला शहरात राज्यातील उष्माघाताचा पहिला बळी गेल्याने चिंतेचे वातावरण पसरले आहे. हा मृत्यू उष्माघातामुळे झाल्याचा दाट संशय आहे. वाढत्या उन्हामुळे नागरिकांनी आपली काळजी घ्यावी, असे आवाहन आता प्रशासनाकडून केले जात आहे. कोल्यात सध्या सूर्याचा आगडोंब सुरू असून तापमानाचा पारा ४४ अंशांवर पोहोचला आहे. याच तीव्र उष्णतेचा फटका बसल्याने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

# डॉ. संग्राम यांना उच्च न्यायालयाचा दिलासा

### इंग्लंडला परत जाण्याची मिळाली परवानगी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात कथित बदनामीकारक पोस्ट केल्याच्या प्रकरणात डॉ. संग्राम पाटील यांना इंग्लंडला परत जाण्याची परवानगी उच्च न्यायालयाने दिली आहे. या प्रकरणात सखोल चौकशीसाठी संबंधित व्यक्तीची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

डॉ. पाटील सध्या परदेशात असून त्यांनी न्यायालयीन प्रक्रियेत ऑनलाइन सहभाग नोंदवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, तपास यंत्रणांनी त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीची गरज अधोरेखित केली. सरकारी बाजूने असा युक्तिवाद करण्यात आला की, सोशल मीडियावरील पोस्ट्सचा प्रभाव व्यापक असतो आणि त्यासंदर्भातील चौकशी प्रत्यक्ष उपस्थितीतच प्रभावीपणे करता येते. न्यायालयाने या युक्तिवादाची दखल घेत, डॉ. पाटील यांनी ठराविक कालावधीत भारतात परत येऊन तपासात सहकार्य करावे, असे निर्देश दिले. तसेच, न्यायालयाने नमूद केले की, सार्वजनिक व्यक्तींविषयी सोशल मीडियावर केलेल्या विधानांमुळे सामाजिक आणि राजकीय पातळीवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अशा प्रकरणांकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. डॉ. पाटील यांच्या वतीने, संबंधित पोस्ट ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या चौकटीत येते आणि त्यामागे कोणताही गुन्हेगारी हेतू नव्हता, असा दावा करण्यात आला. तरीही न्यायालयाने या टप्प्यावर तपास प्रक्रियेला प्राधान्य देत त्यांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

या प्रकरणाची पुढील सुनावणी निश्चित तारखेला होणार असून, त्या वेळी तपासाची प्रगती, तसेच डॉ. पाटील यांच्या अनुपालनाबाबत न्यायालय पुढील आदेश देणार आहे.

### अमेरिकेच्या निर्णयामुळे जागतिक तणाव वाढण्याची चिन्हे

# इराणी तेलावर अमेरिकेचे कडक निर्बंध लागू

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**तेहरान/वॉशिंग्टन :** अमेरिकेने इराणवर दबाव वाढवण्यासाठी नव्या आर्थिक आणि धोरणात्मक हालचालींना वेग दिला असून, इराणी तेलावरील तात्पुरती दिलेली सवलत मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे इराणची आर्थिक कोंडी अधिक तीव्र होण्याची शक्यता असून, जागतिक तेलबाजारावरही त्याचे परिणाम दिसू लागतील. अध्यक्ष ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील धोरणानुसार इराणवर निर्बंध अधिक कडक करण्यात येत आहेत. काही महिन्यांपूर्वी जागतिक तेलपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अमेरिकेने इराणी तेल निर्यातीवर ३० दिवसांची सवलत दिली होती. मात्र, ही सवलत पुढे कायम न ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता इराणला आंतरराष्ट्रीय बाजारात तेल विक्री करणे अधिक कठीण होणार आहे. या निर्णयामुळे इराणच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. तेल निर्यात हा इराणच्या महसुलाचा प्रमुख स्रोत असून, त्यात घट झाल्यास देशांतर्गत महागाई वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तसेच, सरकारी खर्च आणि विकास प्रकल्पांवरही याचा परिणाम होऊ शकतो.

इराणी तेलाचा पुरवठा कमी झाल्यास जागतिक बाजारात तेलटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती वाढू शकतात. आधीच पश्चिम आशियातील संघर्षामुळे ऊर्जा बाजार अस्थिर झाला आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेच्या या निर्णयामुळे तणाव अधिक वाढण्याची चिन्हे आहेत. विशेष म्हणजे, निर्बंध असूनही इराणकडून चीनसारख्या देशांकडे काही प्रमाणात तेलपुरवठा सुरू असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. अमेरिकेने २० मार्च रोजी दिलेल्या सवलतीदरम्यान सुमारे १४० मिलियन बॅरल तेल जागतिक बाजारात पोहोचले होते, ज्यामुळे तात्पुरता दिलासा मिळाला होता. अमेरिकेने ही सवलत का दिली होती, याबाबतही स्पष्टता देण्यात आली आहे. इस्रायल-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर मध्यपूर्वेतील ऊर्जा पायाभूत सुविधांवर हल्ले झाल्याने जागतिक तेलपुरवठा विस्कळीत झाला होता. परिणामी तेलाचे दर झपाट्याने वाढले होते. ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठीच अमेरिकेने तात्पुरती सवलत जाहीर केली होती. आता मात्र ही सवलत १९ एप्रिलनंतर संपुष्टात येणार असून, त्यानंतर इराणवरील निर्बंध अधिक कठोर होणार आहेत. या घडामोडींमुळे जागतिक अर्थकारण आणि ऊर्जा सुरक्षेवर पुढील काही आठवड्यांत महत्त्वाचे परिणाम दिसून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# कैसे हराया..' फेम सहर शेखचे नगरसेवकपद जाणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ठाणे :** महापालिका निवडणूक निकालानंतर कैसे हराया असे म्हणत संपूर्ण राज्यात चर्चेत आलेल्या युवा नगरसेविकेचे पद धोक्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथील एमआयएमची नगरसेविका सहर शेखचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याचा अहवाल ठाणे तहसीलदार उमेश पाटील यांनी दिला आहे.

सहर शेख आणि वडील युनुस शेख यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी शिफारस उमेश पाटील यांनी आपल्या अहवालात केली आहे. उपविभागीय जिल्हाधिकारी ठाणे आणि कोकण विभाग जातपडताळणी समितीकडे शिफारस केली. सहरच्या वडिलांचे जात प्रमाणपत्र अवैध असल्याची तक्रार सिद्दीकी अहमद यांनी केली होती. सहर हिच्याविरोधात सिद्दीकी अहमद यांनी तक्रार केली होती. त्यावर चौकशी करण्यात आली. त्यात सहर दोषी असल्याचे आढळले आहे. आता सहरचे नगरसेवकपद जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या प्रकरणाची चौकशी ठाण्याचे तहसीलदार उमेश पाटील यांनी केली. उमेश पाटील यांनी याबाबतचा अहवाल तयार केला. जातपडताळणी विभाग, निवडणूक विभाग आणि ठाणे उपविभागीय जिल्हाधिकारी कार्यालय यांची फसवणूक केल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. एमआयएमची नगरसेविका सहर शेख ही मूळची उत्तर प्रदेश राज्यातील गाझियाबाद येथील रहिवासी आहे.

## संपादकीय

### प्रतिनिधित्वाचा न्याय



**स्त्री आरक्षणाच्या नावाखाली सीमांकनाचा प्रश्न पुढे आणला जात आहे. प्रतिनिधित्वाचा विस्तार हा लोकशाहीचा नैसर्गिक टप्पा असला, तरी त्यामागील सत्तासमीकरणे बदलण्याचा हेतू दुर्लक्षित करता येत नाही. म्हणूनच हा वाद स्त्री-पुरुष समतेचा नाही; तो सत्तेच्या नव्या वाटपाचा आहे.**

भारतीय लोकशाहीत सीमांकन ही नवी संकल्पना नाही. लोकसंख्येनुसार मतदारसंघांची पुनर्रचना करणे हा घटनात्मक आग्रह आहे. सीमांकन आयोग या संस्थेमार्फत ही प्रक्रिया पार पडते आणि तिचे उद्दिष्ट एकच. समान लोकसंख्या, समान प्रतिनिधित्व. पण भारतात ही प्रक्रिया केवळ तांत्रिक राहिलेली नाही; ती राजकीय झाली आहे. कारण १९७१ नंतर जागावाटप गोठवण्यात आले आणि २०२६ नंतर ते पुन्हा उघडणार आहे. याच टप्प्यावर स्त्री आरक्षणाचा मुद्दा येतो. ३३ टक्के आरक्षण देणारा कायदा मंजूर झाला असला, तरी त्याची अंमलबजावणी सीमांकनाशी जोडली गेली आहे. संविधान (१०६ वी घटनादुरुस्ती) नुसार आरक्षण लागू होण्यासाठी नवीन जनगणना आणि सीमांकन आवश्यक आहे. वरकरणी ही तांत्रिक अट वाटते; प्रत्यक्षात ती राजकीय वेळापत्रक ठरवणारी अट आहे. सरकारचा युक्तिवाद स्पष्ट आहे. लोकसंख्या बदलली आहे, प्रतिनिधित्व बदलले पाहिजे आणि त्याच प्रक्रियेत महिलांना स्थान मिळाले पाहिजे. पण विरोधकांचा प्रश्न वेगळा आहे. स्त्री आरक्षणाची अंमलबजावणी तात्काळ का होऊ शकत नाही? ती सीमांकनाशीच का जोडली गेली आहे? हा प्रश्न केवळ प्रक्रियेचा नाही; तो हेतूचा आहे. सीमांकनाचा खरा परिणाम उत्तर आणि दक्षिण भारतातील तफावतीत दिसून येतो. उत्तर भारतातील राज्यांमध्ये लोकसंख्या वाढ झपाट्याने झाली आहे. दक्षिणेकडील राज्यांनी ती नियंत्रणात ठेवली. जर जागावाटप लोकसंख्येनुसार झाले, तर उत्तर भारताचे प्रतिनिधित्व मोठ्या प्रमाणात वाढेल. दक्षिणेकडील राज्यांचा प्रभाव कमी होईल. हा साधा गणिती परिणाम आहे; पण त्याचे राजकीय परिणाम खोलवरचे आहेत. यात सर्वात मोठा विरोधाभास असा की, ज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवले, त्यांनाच राजकीय तोटा सहन करावा लागणार आहे. हा केवळ अन्याय नाही; हा धोरणात्मक विसंगतीचा कळस आहे. सार्वजनिक धोरणांमध्ये प्रोत्साहन महत्त्वाचे असतात. जर अधिक लोकसंख्या म्हणजे अधिक सत्ता, असे समीकरण तयार झाले, तर लोकसंख्या नियंत्रणाचा संदेशच कमकुवत होईल. या पार्श्वभूमीवर लोकसभेच्या विस्ताराचा मुद्दा निर्णायक ठरतो. सध्या ५४३ सदस्य असलेली लोकसभा भविष्यात ८०० पेक्षा जास्त सदस्यांची होऊ शकते, अशी चर्चा आहे. हे केवळ संख्यात्मक वाढ नाही; तो सत्तेच्या केंद्राचा बदल आहे. मोठ्या राज्यांचा प्रभाव वाढेल, लहान राज्यांचे महत्त्व कमी होईल. राष्ट्रीय पक्षांची रणनीती बदलेल आणि प्रादेशिक पक्षांचे स्थानही नव्याने ठरेल. याच ठिकाणी सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पाचा संदर्भ अनिवार्य ठरतो. नवे संसद भवन केवळ सौंदर्यीकरण नाही. ते भविष्यातील विस्तारित लोकसभेसाठीची तयारी आहे. नव्या इमारतीत वाढीव सदस्यसंख्येला सामावून घेण्याची क्षमता जाणीवपूर्वक ठेवण्यात आली आहे. आज या अस्वस्थतेला स्पष्ट स्वरूप आले आहे. दक्षिणेकडील राज्यांकडून संघराज्यीय संतुलनाचा प्रश्न ठळकपणे मांडला जात आहे. काहीजण लोकसंख्या हा एकमेव निकष न ठेवता आर्थिक योगदान, विकास निर्देशांक यांचाही विचार करावा, असे सुचवतात. हा दृष्टिकोन संख्यात्मक प्रतिनिधित्वाला गुणात्मक संतुलनाची जोड देण्याचा प्रयत्न करतो. परंतु हा मार्ग सोपा नाही. कारण लोकसंख्या हा सर्वात सरळ आणि मोजता येणारा निकष आहे. इतर निकष जोडले, की प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची होते. आणि राजकारणाला गुंतागुंत फारशी मान्य नसते. म्हणूनच, सीमांकनाचा वाद टाळता येणार नाही. तो केवळ कायदेशीर किंवा तांत्रिक नाही; तो मूलत: राजकीय आहे. स्त्री आरक्षण हा या प्रक्रियेचा नैतिक चेहरा आहे. पण त्यामागे सत्तासंतुलनाचा मोठा प्रश्न दडलेला आहे. शेवटी, प्रतिनिधित्वाचा न्याय नेमका कशात आहे, हा प्रश्न उरतो. केवळ लोकसंख्येत की संतुलनात? जर लोकसंख्या हा एकमेव निकष मानला, तर काही राज्यांना तोटा होणार, हे स्पष्ट आहे. आणि जर संतुलन साधायचा प्रयत्न केला, तर प्रक्रिया गुंतागुंतीची होणार, हेही तितकेच स्पष्ट आहे. भारतीय लोकशाही निर्णायक वळणावर उभी आहे. सीमांकन आणि स्त्री आरक्षण या दोन्ही प्रक्रिया अपरिहार्य आहेत. पण त्यांची सांगड कशी घातली जाते, यावर पुढील राजकीय वास्तव ठरणार आहे. लोकशाहीत संख्या महत्त्वाची असते; पण संख्या हीच न्याय ठरत नाही. न्याय तेव्हाच ठरतो, जेव्हा संख्या आणि संतुलन यांच्यात समतोल साधला जातो. सध्या तो समतोल धोक्यात आहे आणि म्हणूनच सीमांकनाचा प्रश्न प्रक्रियेचा नाही; तो लोकशाहीच्या स्वरूपाचा आहे.

# सत्तेचे 'स्त्री'सूक्त आणि पुरुषी मानसिकतेचा अडथळा



भारतीय राजकारणाच्या सारीपाटावर जेव्हा जेव्हा 'आरक्षण' हा शब्द येतो, तेव्हा तेव्हा त्यामागे केवळ सामाजिक न्यायाची भूमिका नसते, तर सत्तेच्या समीकरणांची गणिते दडलेली असतात. मात्र, महिला आरक्षणाबाबतचा विषय हा गणिताचा नसून तो 'गुणाकारा'चा आहे. म्हणजेच, लोकशाहीच्या प्रक्रियेत अर्ध्या लोकसंख्येला सामावून घेतल्यावर मिळणाऱ्या गुणात्मक बदलाचा. महिला आरक्षणाचे विधेयक संसदेत मंजूर होणे, हे पुरुषी मक्तेदारी असलेल्या राजकीय व्यवस्थेतील एका मोठ्या स्थित्यंतराची नांदी आहे. पण हे स्थित्यंतर जितके सहज दिसते, तितके ते प्रत्यक्षात उतरवणे सोपे नाही. कारण, प्रश्न केवळ 'जागा' देण्याचा नसून, 'सत्ता' वाटून घेण्याच्या मानसिकतेचा आहे.

सत्तेचे स्वरूप हे मुळातच निसरडे असते आणि ती सहजासहजी सोडली जात नाही. गेल्या अनेक दशकांपासून महिला आरक्षणाचे विधेयक संसदेच्या बासनात गुंडाळून ठेवले गेले होते, यामागे केवळ राजकीय मतभेद नव्हते, तर एक सुप्त 'पुरुषी भीती' होती. ही भीती अशी की, जर धोरणनिश्चितीच्या प्रक्रियेत स्त्रियांचा टक्का वाढला, तर आतापर्यंत प्रस्थापित असलेली पुरुषी सत्ताकेंद्रे ढासळतील. संसदेच्या इतिहासात या विधेयकाचा प्रवास पाहिला, तर लक्षात येते की, प्रत्येक वेळी काही ना काही तांत्रिक कारणे पुढे करून हे विधेयक लांबणीवर टाकण्यात आले. कधी ओबीसी आरक्षण हा मुद्दा पुढे आला, तर कधी जनगणनेचा अडथळा. पण मूळ मुद्दा हा होता की, सत्तेच्या केंद्रस्थानी बसलेल्या पुरुषांना आपले सिंहासन डळमळीत होण्याची धास्ती वाटत होती.

आज जेव्हा आपण या विधेयकाचा उहापोह करतो, तेव्हा 'पॉवर' म्हणजेच सत्तेची व्याख्या बदलण्याची गरज आहे. सत्ता म्हणजे केवळ हुकूम गाजवण्याचे साधन नसून, ती समाजपरिवर्तनाचे माध्यम असायला हवी. स्त्रियांचा राजकारणातील सहभाग हा केवळ 'टोकनिझम' किंवा नाममात्र प्रतिनिधित्व न राहता, तो धोरणात्मक बदलांसाठी असायला हवा. जगभरातील अनेक प्रगत लोकशाही देशांचा अनुभव असे सांगतो की, जिथे जिथे महिलांचे प्रतिनिधित्व वाढले आहे, तिथे आरोग्य, शिक्षण, बालसंगोपन आणि सामाजिक सुरक्षा या विषयांना अधिक प्राधान्य मिळाले आहे. पुरुषी राजकारण हे अनेकदा 'बाहुबली' संस्कृती, आक्रमकता आणि युद्धाच्या भाषेभोवती फिरते; तर स्त्रियांचे राजकारण हे सहिष्णुता, संवाद आणि मानवी मूल्यांवर आधारित असण्याची शक्यता अधिक असते. सत्तेचे हे विकेंद्रीकरण खऱ्या अर्थाने तळागाळातील स्त्रियांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, ज्यांना संघर्षाची जाण आहे आणि ज्यांच्याकडे सामाजिक प्रश्नांची नवी दृष्टी आहे.

धोरण निश्चितीच्या प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग वाढल्यास अर्थसंकल्पापासून ते परराष्ट्र धोरणापर्यंत सर्वच क्षेत्रांत एक नवा दृष्टिकोन पाहायला मिळेल. अर्थशास्त्राच्या भाषेत सांगायचे तर, 'अनपेड लेबर' (विनामोबदला श्रम) करणाऱ्या स्त्रियांचा आर्थिक प्रक्रियेतील सहभाग जेव्हा धोरणात्मक पातळीवर मान्य केला जाईल, तेव्हाच देशाच्या जीडीपीमध्ये खरी वाढ होईल. स्त्रियांच्या आरक्षणाकडे केवळ उपकार म्हणून न पाहता, ती लोकशाहीतील एक अपरिहार्यता म्हणून पाहिली गेली पाहिजे. केवळ ३३ टक्के जागा राखीव ठेवून भागणार नाही, तर पक्षाच्या निर्णय घेणाऱ्या समित्यांमध्येही महिलांना स्थान द्यावे लागेल. आज किती राजकीय पक्षांचे अध्यक्षपद महिलांकडे आहे? किती पक्षांच्या कोअर कमिटीमध्ये महिलांना निर्णायक शब्द आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधली, तर सत्तेची पुरुषी मांडणी किती घट्ट आहे, याची जाणीव होते.

> » सत्ता आणि लिंगभेद यांच्यातील सनातन संघर्षात 'महिला आरक्षण' ही केवळ औपचारिकता उरली नसून, ती पितृसत्ताक व्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारी प्रक्रिया आहे. संसदेतील टक्क्यांपेक्षाही, ही लढाई धोरणनिश्चितीच्या टेबलावर महिलांचा अधिकार प्रस्थापित करण्याची आहे.

सत्तेचे हे 'स्त्री'सूक्त यशस्वी करायचे असेल, तर पुरुषांना आपले 'इगो' बाजूला ठेवावे लागतील. हे विधेयक म्हणजे पुरुषांवर अन्याय नसून, तो एका मोठ्या अन्यायाचे परिमार्जन करण्याचा प्रयत्न आहे. सत्तेची नवी व्याख्या ही सर्वसमावेशक असायला हवी. जर आपण संसदेत ३३ टक्के स्त्रिया पाहू शकलो, तर ते केवळ आकड्यांचे खेळ नसतील, तर त्या लोकशाहीच्या नवीन चेहऱ्याचे प्रतिबिंब असेल. हा रस्ता खडतर आहे, अडथळे अनेक आहेत, पण एकदा का हे चाक फिरू लागले की, पितृसत्तेच्या जुनाट भिंतींना तडे गेल्याशिवाय राहणार नाहीत. राजकारणातील 'पावर गेम' आता बदलणार आहे. हा बदल केवळ खुर्च्यांचा नसावा, तर तो विचारसरणीचा असावा. सत्तेची नवी व्याख्या स्त्री-पुरुषांच्या बरोबरीच्या सहभागातूनच लिहिता येईल. अन्यथा, ही आरक्षणाची घोषणा म्हणजे केवळ 'निवडणुकीचा जुमला' ठरून इतिहासाच्या पानांवर विरून जाईल. विवेकाचे विसर्जन टाळायचे असेल, तर सत्तेच्या या फेरमांडणीला मनापासून स्वीकारावे लागेल.

# आजच्या पिढीने आंबेडकर विचार आचरणात आणावेत

## पिंपरी-चिंचवडमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध ठिकाणी अभिवादन करण्यात आले. यावेळी महापौर रवि लांडगे यांनी आजच्या पिढीने आंबेडकरांचे विचार केवळ स्मरणात न ठेवता प्रत्यक्ष आचरणात आणण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले.



पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत, भीमसृष्टी, तसेच एच. ए. कॉलनी आणि दापोडी येथील डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यांना महापौर रवि लांडगे आणि महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना लांडगे म्हणाले की, समता, स्वातंत्र्य आणि न्याय या मूल्यांवर उभ्या असलेल्या संविधानाचा पाया डॉ. आंबेडकरांनी घातला. शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्यांच्या विचारांनी समाजात मोठे परिवर्तन घडवले असून त्या विचारांचा अंगीकार करणे ही काळाची गरज आहे. या अभिवादन कार्यक्रमास उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, माजी महापौर योगेश बहल, नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन, कुशाग्र कदम, डॉ. सुहास कांबळे, मंदार देशपांडे, नगरसेविका अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, माई काटे, वर्षा जगताप यांच्यासह महापालिकेचे अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या वतीने ११ ते १७ एप्रिल या कालावधीत ‘सामाजिक समता सप्ताह’ आणि ‘विचार प्रबोधन पर्व’ आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमांद्वारे महापुरुषांच्या विचारांचा प्रसार करून समाजात जागर निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही महापौरांनी केले.

याचबरोबर, पिंपरीतील भीमसृष्टी परिसरात एकता कर्मचारी संघटनेच्या वतीने डॉ. आंबेडकरांना अनोख्या पद्धतीने मानवंदना देण्यात आली. हेलिकॉप्टरद्वारे पुतळ्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. आकाशातून होणाऱ्या या पुष्पवृष्टीमुळे परिसरात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमालाही महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# पावसाळ्यापूर्वी नालेसफाईला वेग

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** गेल्या वर्षी पावसाळ्यात शहरातील अनेक भागांत पूरस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर यंदा पिंपरी-चिंचवड महापालिकेने नालेसफाईच्या कामाला वेग दिला आहे. शहरातील एकूण १४३ लहान-मोठ्या नाल्यांची स्वच्छता सुरू असून आतापर्यंत सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. एप्रिलअखेर सर्व नाले स्वच्छ करण्याचे आरोग्य विभागाचे नियोजन आहे.

शहरात सुमारे १०० किलोमीटर लांबीचे नैसर्गिक नाले असून ते पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांना मिळतात. मात्र, या नाल्यांमध्ये कचरा, प्लास्टिक, भंगार आणि गाळ साचल्याने त्यांची वहन क्षमता कमी होते. परिणामी पावसाळ्यात पाणी साचून घरांमध्ये व दुकानांत घुसते. गतवर्षी चिखली, रूपीनगर, पिंपळे गुरव, सांगवी, दापोडी आणि चिंचवड परिसरात पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे यंदा महापालिकेने मार्चअखेरपासूनच नालेसफाई मोहीम सुरू केली आहे. जेसीबीसह यांत्रिक साधनांचा वापर करून काम करण्यात येत असून त्याची नोंद डिजिटल पद्धतीने ठेवली जात आहे.

पाणी साचणे, नाले तुंबणे किंवा पूरस्थिती निर्माण होणे टाळण्यासाठी महापालिकेच्या यंत्रणांनी सजग राहणे आवश्यक आहे. नालेसफाईची कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने आणि वेळेत पूर्ण करणे महत्त्वाचे आहे. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकांना दिलासा द्यावा, असे आदेश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त संयुक्त अभिवादन

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पुणे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पुणे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मध्यवर्ती समिती’च्या वतीने भव्य संयुक्त अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० वाजता पार पडलेल्या या कार्यक्रमात राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांनी एकत्र येत महामानवाला अभिवादन केले.



या सोहळ्यास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार बापूसाहेब पठारे, आमदार चेतन तुपे, माजी आमदार मोहन जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, गणेश बिडकर, नगरसेवक निलेश आल्हाट, ज्येष्ठ नेते बाळासाहेब जानराव, रिपाई शहराध्यक्ष संजय सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे, महिपाल वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात प्रशासकीय यंत्रणांचाही उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. विभागीय आयुक्त चंद्रकांत कुंडलवार आणि समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांनी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर बौद्ध भिक्षूंच्या उपस्थितीत सामूहिक बुद्ध वंदना आणि भीमस्तुती सादर करण्यात आली.

# आयसीयूमध्ये रुग्णाचा संताप अनावर; वृद्ध महिला जखमी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**




**पुणे :** पुणे शहरातील औंध येथील जिल्हा रुग्णालयात आयसीयू वॉर्डमध्ये घडलेल्या धक्कादायक घटनेने आरोग्य यंत्रणेतील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. उपचार घेत असलेल्या एका वृद्ध महिलेला सह-रुग्णाने दरवाज्याची काच फोडून जखमी केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी सांगवी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कांता मारुती जाधव (वय ६९, रा. ताथवडे) या आयसीयू वॉर्डमध्ये उपचारासाठी दाखल होत्या. दि. १३ एप्रिल रोजी दुपारी सुमारे १२.१० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या शेजारील बेडवरील रुग्ण बाबासाहेब शंकर डोंगरे (वय ४२) याने संतापाच्या भरात आयसीयू वॉर्डचा दरवाजा बंद केल्याच्या कारणावरून दरवाज्याची काच फोडली. या घटनेत फुटलेल्या काचेचे तुकडे जाधव यांच्या उजव्या हाताच्या कोपराजवळ लागून त्या जखमी झाल्या. तात्काळ त्यांच्यावर उपचार करण्यात आले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११८(१) आणि ३२४(४) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. घटनेनंतर आरोपी फरार झाला असून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. आयसीयू सारख्या अतिसंवेदनशील विभागात अशा प्रकारची घटना घडल्याने रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. रुग्णांमध्ये उद्भवणाऱ्या मानसिक तणावाचा आणि त्यावर नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणांचा अभाव यावरही चर्चा सुरू झाली आहे.

### जुन्या वादातून तरुणाचे अपहरण

**खेड :** खेड तालुक्यात जुन्या वादातून एका तरुणाचे अपहरण केल्याची गंभीर घटना उघडकीस आली असून पोलिसांनी तातडीने कारवाई करत सहा आरोपींना अटक केली आहे, तर एका अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेण्यात आले आहे. ही घटना १२ एप्रिल रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास घडली. ऋषिकेश दिलीप कल्हाटकर (वय २६, रा. कोरेगाव बुद्रुक, ता. खेड, जि. पुणे) याचे जुन्या भांडणाच्या कारणावरून काही जणांनी अपहरण केले.

आरोपींनी जबरदस्तीने कल्हाटकर यांना लाल रंगाच्या थार गाडी आणि पांढऱ्या रंगाच्या नेक्सॉन कारमधून उचलून नेले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी खेड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील आरोपींना अटक केली आहे: सागर बाळू जावळे (वय ३४), नितीन संजय थिटे (वय २७), सौरभ ऊर्फ सोन्या अनिल धोरे (वय २८), अजय भरत गोपाळे (वय २३), कुणाल प्रशांत चव्हाण (वय २३), ओंकार उदयशंकर कोरडे (वय २४) याशिवाय एका अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेण्यात आले आहे. घटनेनंतर पोलिसांनी जलद हालचाली करत अपहरण झालेल्या तरुणाचा शोध घेतला आणि त्याची सुखरूप सुटका करण्यात यश मिळवले.

या अपहरणामागील नेमका हेतू, पूर्वीचा वाद आणि इतर संभाव्य सहकारी यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

### दापोडीत अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई

**पुणे :** पुणे शहरातील दापोडी परिसरात अवैध दारू विक्रीविरोधात पोलिसांनी कारवाई करत एका व्यक्तीवर गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई १३ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ७.२० वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. दापोडी पोलीस ठाणे हद्दीतील विश्वासचाळ परिसरात नारायण दुग्गा साळवी (वय ४९, रा. सिद्धार्थनगर, दापोडी) हा बेकायदेशीररित्या देशी दारू साठवून विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. कारवाईदरम्यान आरोपीकडून सुमारे १०,००० रुपये किमतीचा १०० लिटर गावठी हातभट्टीचा दारू साठा जप्त करण्यात आला. आरोपीकडे दारू विक्रीसाठी कोणतीही वैध परवानगी नसल्याचे उघड झाले.

# बीआरटी मार्गिकेत खासगी वाहनांची घुसखोरी

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील बीआरटी मार्गिकांमध्ये खासगी वाहनांची वाढती घुसखोरी गंभीर समस्या बनली आहे. पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बसगाड्यांसाठी राखीव असलेल्या या मार्गिकांमधून चारचाकी व दुचाकी वाहने सर्रासपणे धावत असल्याने सार्वजनिक वाहतुकीच्या सुरक्षेवर परिणाम होत आहे.

आळंदी, वाकड, भोसरी, निगडी आदी भागांत ही समस्या प्रकर्षाने दिसून येत आहे. खासगी वाहनांमुळे बसगाड्यांचा वेग कमी होत असून चालकांना वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे.

काही ठिकाणी वाहनचालक स्वतःच्या सोयीसाठी बीआरटी मार्गिकेत वाहने उभी करत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

महापालिकेकडून यापूर्वी परवाना रद्द करणे, सीसीटीव्ही बसविणे अशा उपाययोजना राबविण्यात आल्या होत्या. मात्र, वाढत्या घुसखोरीमुळे त्या अपुऱ्या ठरत असल्याचे दिसत आहे. परिणामी प्रवाशांना वेळेत गंतव्यस्थानी पोहोचण्यात अडथळे निर्माण होत आहेत.

या पार्श्वभूमीवर अनधिकृत वाहनांवर टोइंग कारवाई, कडक दंड, नियमित पोलिस गस्त आणि कठोर अंमलबजावणीची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### गाड्या परस्पर विकून २२ लाखांचा अपहार

**लोणीकंद** : ट्रान्सपोर्ट व्यवसायासाठी घेतलेल्या गाड्यांचे बँक हप्ते भरण्याच्या अटीवर ताब्यात घेतलेल्या गाड्या परस्पर विकून २२ लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी डोंगरगाव (ता. हवेली) येथील एकावर लोणीकंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेश उर्फ उत्तम उर्फ बापू मुरलीधर गायकवाड (रा. माळवाडी, डोंगरगाव, ता. हवेली) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी पांडुरंग भाऊसाहेब पायगुडे (वय ५०, रा. वाडेबोल्हाई, ता. हवेली) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी पांडुरंग पायगुडे हे २००१ पासून ट्रान्सपोर्ट व्यवसाय करत आहेत. मार्च २०२२ च्या सुमारास सुरेश गायकवाड यांनी त्या गाड्या धंद्यासाठी मागितल्या. "गाड्यांचे फायनान्स कंपनीचे मासिक हप्ते लोन संपेपर्यंत भरावेत," या अटीवर पायगुडे यांनी तीन गाड्या गायकवाड यांच्या ताब्यात दिल्या होत्या.

### घरात घुसून विवाहितेचा विनयभंग

**शिरूर** : तालुक्यातील कवठे यमाई येथे एका विवाहित महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कवठे यमाई (ता. शिरूर, जि. पुणे) येथील एका महिलेने फिर्याद दिली आहे. दि. ३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास ती महिला घरी एकटी असताना आरोपी शरीफ उस्मान पिंजारी (रा. कवठे यमाई) हा दारूच्या नशेत घरात घुसला. आणि त्याने पिडितेचा विनयभंग केला. झटापटीदरम्यान पिडितेचे कानातील टॉप्स पडून हरवले असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तिने आरडाओरडा केल्यानंतर तिचे नातेवाईक घटनास्थळी धावून आले. त्यांना पाहताच आरोपी बजाज डिस्कव्हर (एमएच १४ डीएस ११३७) या दुचाकीवरून पसार झाला.

### साखर दरातील मंदी व इथेनॉल उठावाअभावी कारखान्यांची अडचण

# एफआरपी थकबाकीचा प्रश्न गंभीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : राज्यातील साखर उद्योगासमोरील आर्थिक अडचणी अधिक तीव्र होत असून त्याचा फटका थेट उस उत्पादक शेतकऱ्यांना बसत आहे. घाऊक बाजारात साखरेचे दर घसरलेले असताना इथेनॉललाही अपेक्षित मागणी मिळत नसल्याने कारखान्यांना शेतकऱ्यांची रास्त आणि किफायतशीर किंमत (एफआरपी) देण्यात अडचणी येत असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. साखर आयुक्तालयात झालेल्या सुनावणीत कारखाना प्रतिनिधींनी हीच भूमिका मांडत थकीत रक्कम देण्यासाठी मुदत मागितली.

२०२५-२६ च्या हंगामात २९ साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांना देय असलेली एफआरपीची एकूण रक्कम ३०७४ कोटी ३३ लाख रुपये इतकी आहे. यापैकी २०६१ कोटी ८९ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले असले तरी तब्बल १०१२ कोटी ४४ लाख रुपये अद्याप थकीत आहेत. ३१ मार्च २०२६ अखेरच्या अहवालानुसार, ८० टक्क्यांपेक्षा कमी एफआरपी अदा केलेल्या कारखान्यांविरोधात सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीस २९ पैकी २४ कारखान्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. कारखान्यांनी आपल्या अडचणींचा पाढा मांडताना साखरेची घटती मागणी, बाजारातील कमी दर, इथेनॉल खरेदीतील मर्यादा आणि आर्थिक तरलतेचा अभाव ही प्रमुख कारणे नमूद केली. विशेषतः इथेनॉल उत्पादन वाढूनही तेल कंपन्यांकडून अपेक्षित प्रमाणात खरेदी होत नसल्याने कारखान्यांचे उत्पन्न अडकून पडत असल्याचे सांगण्यात आले. त्याचबरोबर, एफआरपी देण्यासाठी आवश्यक असलेले कर्ज प्रस्ताव काही खासगी व जिल्हा बँकांकडे प्रलंबित असल्याने निधी उभारणीमध्ये अडथळे येत असल्याची तक्रार करण्यात आली.

केंद्र सरकारकडे अतिरिक्त साखर विक्रीसाठी कोटा मंजूर करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असून तो मंजूर झाल्यास अतिरिक्त साखर विक्रीतून निधी उपलब्ध होईल आणि शेतकऱ्यांची थकीत देणी फेडणे शक्य होईल, असा दावा कारखान्यांकडून करण्यात आला. तथापि, सध्याच्या परिस्थितीत आर्थिक ताण कायम असल्याने तातडीने पूर्ण देयक अदा करणे कठीण असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर "३० एप्रिलपर्यंत थकीत एफआरपीची रक्कम देण्याचा प्रयत्न करू," असे आश्वासन कारखान्यांनी दिले आहे. मात्र, याबाबत प्रशासन समाधानी नसून पुढील सुनावणी ७ मे रोजी साखर संकुल येथे निश्चित करण्यात आली आहे. जे कारखाने सुनावणीस अनुपस्थित राहिले, त्यांना नव्याने नोटिसा पाठवण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, शेतकरी संघटनांकडून या प्रकरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून एफआरपी ही कायदेशीर हमी असलेली रक्कम असल्याने तिच्या देयकात विलंब अस्वीकार्य असल्याचे मत व्यक्त होत आहे. परिस्थिती लवकर सुरळीत न झाल्यास आंदोलनाचा इशाराही दिला जात आहे. त्यामुळे साखर उद्योगातील आर्थिक अडचणी आणि शेतकऱ्यांच्या हक्काच्या देयकांतील विलंब हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## मांदळेवाडीत पाण्याचा टँकर सुरू



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मांदळेवाडी, वडगावपीर, धामणी आणि पहाडधरा या दुष्काळग्रस्त गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून ग्रामस्थांना, घोटभर पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर मांदळेवाडी येथे पाण्याचा टँकर सुरू करण्यात आला असून, त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

या परिसरातील गावांसाठी जलजीवन मिशन तसेच सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांतर्गत कोट्यवधी रुपयांच्या योजना मंजूर करून राबवण्यात आल्या होत्या. काही काळ या योजनांद्वारे नियमित पाणीपुरवठा होत होता. मात्र, सध्या या योजनांचा पुरवठा विस्कळीत झाला असून काही ठिकाणी दोन ते तीन दिवसांआडच पाणी दिले जात आहे. यामुळे नागरिकांची गैरसोय वाढली असून दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत मांदळेवाडी गावात सुरू करण्यात आलेल्या टँकरद्वारे पाणीपुरवठा हा तात्पुरता उपाय ठरत आहे. ग्रामस्थांनी टँकरमधून पाणी भरताना पाण्याची नासाडी होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन सरपंच उज्वला आदक यांनी केले आहे. तसेच या भागासाठी कायमस्वरूपी पाणीपुरवठा व्यवस्था उभी करण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे.

## जवळे ग्रा.पं.कडून प्लास्टिक बंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील जवळे ग्रामपंचायतीने पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलत गावात प्लास्टिक बंदीची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री पंचायत राज आणि 'माझी वसुंधरा' अभियानाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून गावात विविध प्रकारच्या प्लास्टिक वस्तूंवर निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

या निर्णयानुसार प्लास्टिक ग्लास, पत्रावळे, थर्माकोल प्लेट्स, प्लास्टिक चमचे तसेच ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालण्यात आली आहे. गावातील सर्व व्यावसायिक आस्थापनांनाही या नियमांचे पालन बंधनकारक करण्यात आले असून उल्लंघन केल्यास शासकीय नियमानुसार कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

प्लास्टिक वापर कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून जनजागृतीवरही भर देण्यात येत आहे. विशेषतः महिला भगिनींना प्लास्टिक पिशव्यांचे संकलन करून त्या ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्याचे आवाहन करण्यात आले. या उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये प्रथम तीन क्रमांक पटकावणाऱ्या महिलांना मानाची पैठणी देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत संध्या दिनकर वाळुंज, वैशाली श्रीकांत वायकर आणि सुनीता नारायण तांबे यांनी अनुक्रमे क्रमांक पटकावत पुरस्कार मिळवला. या उपक्रमाला गावातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

ग्रामपंचायत जवळे ही नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आघाडीवर असून या उपक्रमासाठी आंबेगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज आणि विस्तार अधिकारी हुजरे यांचे मार्गदर्शन लाभल्याचे सरपंच सौ. वृषाली उत्तम शिंदे पाटील यांनी सांगितले.

या प्रसंगी मनीषा टाव्हरे, चंद्रकला गायकवाड, शुभांगी खालकर, प्रमिला गावडे, संगीता साबळे, शालन सोनवणे, पूजा शिंदे, प्रमिला खालकर तसेच ग्रामपंचायत अधिकारी शीला साबळे यांसह अनेक महिला उपस्थित होत्या.

## 'त्या' धोकादायक विहिरीला अखेर कठडे

### पारगाव परिसरातील वाहतूक झाली सुरक्षित

■ दैनिक राज्य लोकतंत्र



छायाचित्र : किशोर खुडे

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील पारगाव गावठाण ते लोखंडे मळा-दातखिळे मळा या रस्त्यालगत असलेली विहीर वाहतुकीसाठी धोकादायक बनली होती. याबाबत वृत्त प्रसिद्ध होताच प्रशासनाने तात्काळ दखल घेत प्रभावी कार्यवाही केली.

पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी या वृत्ताची गांभीर्याने दखल घेत त्वरित घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पाहणीदरम्यान त्यांनी संबंधित विहीर मालक सुभाष कुशाबा लोखंडे यांना संभाव्य अपघाताचा धोका समजावून सांगत विहिरीभोवती सुरक्षेसाठी कठडे बसवण्याची विनंती केली.

सुभाष लोखंडे यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत तत्काळ सहकार्य दर्शविले आणि विहिरीला कठडे बसविण्यास होकार दिला. त्यानुसार विहिरीभोवती लोखंडी कठडे तसेच जाळी बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर विहीर सन १९८२ साली बांधण्यात आली होती. मात्र त्यानंतर अनेक वर्षे या रस्त्यावरून वाहतूक धोकादायक पद्धतीने सुरू होती. विहिरीला कठडे बसवावेत, अशी मागणी माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी ग्रामपंचायतीकडे केली होती. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दैनिक राज्य लोकतंत्रने वृत्त प्रसिद्ध केले होते.

सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या पाठपुराव्यामुळे आणि विहीर मालकाच्या सहकार्यामुळे अखेर या धोकादायक ठिकाणी सुरक्षा उपाययोजना पूर्ण झाल्या आहेत. त्यामुळे आता या मार्गावरील वाहतूक अधिक सुरक्षित झाली असून संभाव्य अपघाताचा धोका टळला आहे. या सकारात्मक कार्यवाहीबद्दल स्थानिक नागरिकांनी दैनिक राज्य लोकतंत्र तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## उन्हाची तीव्रता वाढताच माठांना मागणी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागल्याने "गरीबांचा फ्रिज" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मातीच्या माठांची मागणी पुन्हा वाढू लागली आहे. तालुक्यातील विविध आठवडे बाजारांमध्ये माठ विक्रीसाठी आले असून, लोणी (ता. आंबेगाव) येथील बुधवारी भरलेल्या बाजारात ग्राहकांची लक्षणीय गर्दी पाहायला मिळाली.

मार्च-एप्रिलपासून तापमानात वाढ होत असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी माठ खरेदीकडे नागरिकांचा कल वाढत आहे. माठातील पाणी नैसर्गिकरीत्या थंड राहते तसेच आरोग्यासाठीही लाभदायक मानले जाते. त्यामुळे ग्रामीण भागासह शहरी भागातही अनेकजण माठ खरेदी करताना दिसत आहेत. होळीनंतर उन्हाचा दाह अधिक तीव्र झाला असून येणारा उन्हाळा आणखी कडक राहण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत थंड पाण्यासाठी फ्रिजऐवजी माठाचा पर्याय अधिक पसंत केला जात आहे. माठातील पाण्याची चवही गोडसर आणि ताजेतवाने वाटत असल्याने त्याचे आकर्षण कायम आहे.यंदाही हॉटेल्स, पाणपोई आणि सार्वजनिक ठिकाणी माठांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. यामुळे कुंभार समाजालाही हंगामी रोजगार उपलब्ध होत आहे. माठाचे महत्त्व आजही टिकून असून सर्वसामान्यांसह सधन वर्गातही त्याची मागणी कायम असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## मुक्तादेवी यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यतींचा थरार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथे कुलदैवत मुक्तादेवी यात्रेनिमित्त शनिवार (दि. १८) व रविवार (दि. १९) रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यतींचा थरार अनुभवायला मिळणार आहे.

शनिवारी सकाळी ७ वाजता मुक्तादेवीची पूजा पार पडणार असून त्यानंतर मांडव-डहाळ्यांची पारंपरिक मिरवणूक काढण्यात येणार आहे. देवीला 'चोळी पातळ' परिधान करून धार्मिक विधी संपन्न होतील. यानंतर दिवसभर बैलगाडा शर्यती रंगणार असून, स्पर्धकांसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. प्रथम क्रमांकासाठी ७१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ५१ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी ३१ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात



आले आहे. अंतिम फेरीसाठीही स्वतंत्र बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत.

शनिवारी रात्री १० नंतर अश्विनी-शिवानी बोरगावकर यांच्या लोकनाट्य तमाशाचा रंगतदार कार्यक्रम होणार आहे. रविवारी सकाळी १० वाजता शाहीर रामदास गुंड (तुरेवाले) आणि शाहीर ठकसेन शिंदे (कलगीवाले) यांच्यात कलगीतुऱ्याचा जंगी सामना रंगणार असून तो यात्रेचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. या दोन दिवसांच्या यात्रेदरम्यान पारगाव परिसरात मोठी गर्दी होण्याची शक्यता असून ग्रामस्थांनी सर्व तयारी पूर्ण केली आहे.

## चाळकवाडीत डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळवंडी** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चाळकवाडी व अंगणवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रतिमापूजन कार्यक्रम ज्येष्ठ नागरिक दगडू रामभाऊ चाळक यांच्या हस्ते पार पडला.

या प्रसंगी शाळेतील विद्यार्थी तसेच अंगणवाडीतील लहान मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रदीप वायकर, बाळासाहेब रामभाऊ वामन, आशाताई गायकवाड, राहुल गायकवाड, अंगणवाडी सेविका




पल्लवी तसेच शाळेचे मुख्याध्यापक गणेश जाधव, शिक्षक सुजित साबळे आणि पालकवर्ग उपस्थित होता.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित विचारप्रवर्तक भाषणे सादर केली. त्यांच्या सादरीकरणातून समता, शिक्षणाचे महत्त्व आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश अधोरेखित झाला. अंगणवाडीतील बालकांनीही आपल्या निरागस सहभागातून कार्यक्रमात रंगत आणली. मुख्याध्यापक गणेश जाधव यांनी प्रास्ताविकातून डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचे अनुकरण करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिक्षक सुजित साबळे यांनी केले. तसेच आशाताई गायकवाड यांच्या परिवारातर्फे विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

### सहा सराईत आरोपी जेरबंद

# सोन्याच्या बिस्किटांच्या आमिषाने फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : वयोवृद्धांना सोन्याची बिस्किटे देण्याचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या परजिल्ह्यातील सहा सराईत गुन्हेगारांना मंचर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून सुमारे ३ लाख ९३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी दिली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये गणेश विनायक गायकवाड (रा. भालगाव, ता. पाथर्डी), मनोहर भाऊसाहेब जाधव (रा. एकनाथवाडी, ता. पाथर्डी), बंडू लक्ष्मण जाधव, खंडू बंडू जाधव (रा. गांधीनगर, जि. बीड), सतिश रस्तूम पवार आणि सोमनाथ निवृत्ती फुंदे (रा. भालगाव, ता. पाथर्डी) यांचा समावेश आहे. मंचर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसांपासून वयोवृद्ध महिला व पुरुषांना लक्ष्य करून फसवणुकीच्या घटना घडत होत्या. आरोपी बनावट पिवळ्या धातूची बिस्किटे दाखवून ती सोन्याची असल्याचा बनाव करत. "ही बिस्किटे खरेदी केल्यास मोठा फायदा होईल," असे सांगून ते विश्वास संपादन करत आणि त्यानंतर पीडितांच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेऊन फरार होत असत.

या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान कळंब गावाच्या हद्दीत पुणे-नाशिक महामार्गावर संशयास्पदरीत्या उभ्या असलेल्या वाहनात सहा जण आढळून आले. चौकशीदरम्यान त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र कसून चौकशीनंतर त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले. पोलीस कोठडीत चौकशीदरम्यान आरोपींनी आणखी दोन गुन्ह्यांची कबुली दिली असून त्यातील मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेले वाहन तसेच सुमारे २ लाख ९३ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदिप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, सुनिल बडगुजर, उपनिरीक्षक सनिल धनवे तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदारांनी केली. पुढील तपास सुरू आहे.

## मळगंगामाता-मुक्तादेवी यात्रोत्सव उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर** : जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार येथे मळगंगामाता व मुक्तादेवी यांचा यात्रोत्सव रविवारी (दि. १२) व सोमवारी (दि. १३) मोठ्या उत्साहात साजरा झाला.

यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांसह बैलगाडा शर्यती आणि कुस्ती आखाड्याचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी सकाळी ६ ते ८ या वेळेत देवीचा अभिषेक व वस्त्रालंकार अर्पण करण्यात आले. त्यानंतर सकाळी ८ ते ९ या वेळेत मांडव डहाळे कार्यक्रम पार पडला. सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बैलगाड्यांच्या भव्य शर्यती रंगल्या. सायंकाळी ६ ते ७ या वेळेत शेरणी कार्यक्रम झाला. त्यानंतर सायंकाळी ८.३० ते १०.३० या वेळेत छबिना मिरवणूक व शोभेची आतषबाजी पार पडली.

रात्री १० वाजता आनंद लोकनाट्य मंडळ, जळगाव यांचा लोकनाट्य तमाशा सादर करण्यात आला. या कार्यक्रमांना पुणे, मुंबई तसेच बाहेरगावी राहणाऱ्या पिंपरी पेंढारकरांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

धार्मिक, पारंपरिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या संगमातून पिंपरी पेंढारचा यात्रोत्सव भव्य व आनंदमय वातावरणात साजरा होत असल्याची माहिती संयोजकांनी दिली.

## सारांश वृत्त

### आंध्रमध्ये जनगणना डिजिटल स्वरूपात

**अमरावती:** जनगणना २०२७ अंतर्गत स्व-गणना प्रक्रिया संपूर्ण आंध्र प्रदेशामध्ये १६ एप्रिलपासून दोन टप्प्यांत डिजिटल स्वरूपात सुरू होईल, अशी माहिती जनगणना कार्यसंचालक जे. निवास यांनी बुधवारी दिली. पहिल्या टप्प्यात घरांची यादी आणि गृहगणना मनुष्यबळ आणि लॉजिस्टिक आवश्यकतांचा अंदाज घेण्यासाठी घरे आणि इमारतींची मोजणी केली जाईल. संपूर्ण जनगणना २०२७ डिजिटल पद्धतीने पार पाडली जाईल, ज्यामुळे माहिती संकलन आणि प्रक्रियेमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडेल, असेही ते म्हणाले.

### केरळमध्ये वीज वापराचे विक्रम मोडीत

**तिरुवनंतपुरम** : तीव्र उष्णतेमुळे केरळमधील विजेचा वापर अभूतपूर्व पातळीवर वाढला असून, १४ एप्रिल रोजी राज्यात आतापर्यंतची सर्वाधिक विजेची मागणी नोंदवली गेली. वीज मंत्री के. कृष्णनकुट्टी यांनी बुधवारी एका फेसबुक पोस्टमध्ये सांगितले की, एकूण दैनंदिन वापर ११२.५२ दशलक्ष युनिट्सवर पोहोचला असून, तो या महिन्यात आतापर्यंतचा सर्वाधिक नोंदवलेला वापर आहे. मंगळवारी सर्वाधिक मागणीच्या वेळेत विजेची मागणी ६,०१२ मेगावॅटवर पोहोचली, जो राज्याच्या इतिहासातील आतापर्यंतचा उच्चांक आहे, असे ते म्हणाले.

### जबाबदार पत्रकारिता लोकशाहीचा पाया

**गंगटोक** : सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेम सिंह तामांग यांनी बुधवारी सांगितले की, स्वतंत्र आणि जबाबदार पत्रकारिता हा एका सशक्त लोकशाहीचा पाया आहे. ते म्हणाले की, या हिमालयीन राज्याला एक निर्भय आणि गतिमान माध्यम समुदाय लाभला आहे, जो आपले काम निष्ठेने करतो. "स्वतंत्र आणि जबाबदार पत्रकारिता हा सशक्त लोकशाहीचा पाया आहे. सिक्कीम आत्मविश्वासाने पुढे वाटचाल करत असताना, माहिती देणारी, प्रश्न विचारणारी आणि प्रेरणा देणारी निर्भय आणि गतिमान माध्यमे पाहून आनंद होतो," असे ते येथे एका कार्यक्रमात बोलताना म्हणाले.

## अर्थवाढ ६.५ टक्क्यांवर स्थिर राहण्याचा अंदाज

# घाऊक महागाई 38 महिन्यांच्या उच्चांकावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : जागतिक ऊर्जा बाजारातील अस्थिरता आणि पश्चिम आशियातील वाढत्या तणावाचा थेट परिणाम देशातील महागाईवर दिसून येत असून मार्च २०२६ मध्ये घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई ३.८८ टक्क्यांवर पोहोचली आहे. हा गेल्या ३८ महिन्यांतील उच्चांक मानला जात आहे. मात्र या पार्श्वभूमीवरही आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताची अर्थव्यवस्था २०२६-२७ या आर्थिक वर्षात ६.५ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज कायम ठेवला आहे.

उद्योग मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, मार्च महिन्यात घाऊक महागाईत सलग पाचव्यांदा वाढ नोंदवण्यात आली आहे. कच्चे पेट्रोलियम, नैसर्गिक वायू, मूलभूत धातू, खाद्येतर वस्तू आणि उत्पादित वस्तूंच्या किमती वाढल्याने ही महागाई वाढली आहे. विशेषतः २८ फेब्रुवारीपासून



तीव्र झालेल्या अमेरिका-इस्रायल-इराण संघर्षामुळे जागतिक ऊर्जा दरांमध्ये मोठी उसळी पाहायला मिळाली. कच्च्या तेलाच्या किमती सुमारे ७५ डॉलर प्रति बॅरलवरून १२२ डॉलरपर्यंत वाढल्याने इंधन आणि वीज खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे. या वाढीचा परिणाम इंधन आणि ऊर्जा क्षेत्रातील महागाईवर स्पष्टपणे दिसून आला असून फेब्रुवारीतील घटीनंतर मार्चमध्ये ती पुन्हा वाढीच्या मार्गावर आली. कच्च्या पेट्रोलियममधील महागाई ५१ टक्क्यांहून अधिक झाली, तर उत्पादित वस्तूंची महागाईही वाढून ३.३९ टक्क्यांवर पोहोचली. याउलट अन्नधान्याच्या किमतींमध्ये काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. अन्नपदार्थ महागाई २.१९ टक्क्यांवरून १.९० टक्क्यांपर्यंत घसरली असून भाजीपाल्याच्या किमतीतही घट नोंदवण्यात आली आहे. जागतिक परिस्थितीचा परिणाम पुढील काही महिन्यांतही कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बार्कलेजच्या अहवालानुसार, ऊर्जा दर उच्च राहिल्यास घाऊक महागाईत आणखी वाढ होऊ शकते. त्याचवेळी भारतीय रिझर्व्ह बँक व्याजदर सध्या स्थिर ठेवण्याची भूमिका कायम ठेवेल, असे संकेत आहेत. दरम्यान, महागाईचा ताण कमी करण्यासाठी केंद्र सरकारने २६ मार्च रोजी पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १० रुपयांनी कमी केले आहे. वाढत्या कच्च्या तेलाच्या किमतींचा पूर्ण भार ग्राहकांवर पडू नये, हा यामागील उद्देश आहे. तरीही, जर पश्चिम आशियातील तणाव दीर्घकाळ कायम राहिला, तर देशांतर्गत इंधन दर आणि महागाईवर त्याचा अधिक परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याच काळात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाईतही वाढ झाली असून ती फेब्रुवारीतील ३.२१ टक्क्यांवरून मार्चमध्ये ३.४ टक्क्यांवर पोहोचली आहे. काही अन्नपदार्थांच्या किमती वाढल्याने ही वाढ झाली आहे.

अशा प्रतिकूल परिस्थितीतही आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताच्या आर्थिक वाढीचा अंदाज ६.५ टक्क्यांवर कायम ठेवला आहे. त्यामुळे जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवरही भारत सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## ममता बॅनर्जींचा सुरक्षा दलांवर गंभीर आरोप



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : ममता बॅनर्जी यांनी बुधवारी केंद्रीय सुरक्षा दलांवर गंभीर आरोप करत, कोलकाता विमानतळाकडे जात असताना त्यांच्या वाहनाची झडती घेण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा दावा केला.

हा वाद तृणमूल काँग्रेसने निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांनंतर अधिक तीव्र झाला आहे. पक्षाचा आरोप आहे की निवडणूक आयोगकडून त्यांच्या नेत्यांना लक्ष्य करून वाहनांची "आक्रमक तपासणी" करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पक्षाचे राज्य महासचिव कुणाल घोष यांनीही या मुद्द्यावर भूमिका स्पष्ट करत, "इतर पक्षांच्या नेत्यांना वगळून केवळ आमच्या नेत्यांनाच लक्ष्य केले जात आहे. हे निवडक कारवाईचे उदाहरण आहे," असा आरोप केला.

तृणमूल काँग्रेसने काही कथित अंतर्गत सूचनांचे स्क्रीनशॉट सादर करत असा दावा केला आहे की, निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार भरारी पथकांना (फ्लाइंग स्क्वॉड) 'संरक्षित' नेते आणि मंत्र्यांची सखोल तपासणी करण्यास सांगण्यात आले आहे. या निर्देशांनुसार मुख्यमंत्री वगळता इतर सर्व नेत्यांची सार्वजनिक ठिकाणी तपासणी करण्याचे आदेश असल्याचेही पक्षाचे म्हणणे आहे.

दरम्यान, भरारी पथके ही निवडणुकीदरम्यान अवैध रोख रक्कम किंवा अन्य उल्लंघनांवर नजर ठेवण्यासाठी तैनात करण्यात येणारी अधिकृत यंत्रणा आहे. मात्र, या यंत्रणेचा वापर राजकीय हेतूंनी केला जात असल्याचा आरोप सत्ताधारी पक्षाकडून करण्यात येत आहे. या सर्व आरोपांवर अद्याप निवडणूक आयोगकडून अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

## सम्राट चौधरी बिहारचे नवे मुख्यमंत्री

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाटणा** : सम्राट चौधरी यांनी बुधवारी बिहारच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेत राज्याच्या राजकारणात नवे पर्व सुरू केले. राज्यात मुख्यमंत्रीपद भूषवणारे ते भारतीय जनता पार्टीचे पहिले नेते ठरले आहेत. येथील लोक भवनात राज्यपाल सय्यद अता हसनैन (निवृत्त) यांनी चौधरी यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ दिली. यावेळी विजय कुमार चौधरी आणि बिजेंद्र प्रसाद यादव यांनीही मंत्रिमंडळ सदस्य म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ घेतली.

शपथविधीनंतर चौधरी यांनी "राज्याच्या समृद्धीसाठी तात्काळ कामाला सुरुवात करू. बिहारमध्ये नरेंद्र मोदी आणि नीतीश कुमार यांच्या विकास मॉडेलनुसारच शासन सुरू राहील," असे स्पष्ट केले. या सोहळ्यास जेपी नड्डा, चिराग पासवान, नीतीश कुमार यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील वरिष्ठ नेते आणि आमदार उपस्थित होते. दोन दशकांहून अधिक काळ मुख्यमंत्री राहिलेल्या नीतीश कुमार यांनी मंगळवारी पदाचा राजीनामा दिल्यानंतर भाजप विधिमंडळ पक्षाने चौधरी यांची नेतेपदी निवड केली होती.

चौधरी यांच्या निवडीबद्दल अभिनंदन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या तळागाळातील अनुभवाचा राज्याच्या विकासाला मोठा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला. "त्यांच्या नेतृत्वाखाली बिहार सर्वांगीण प्रगतीची नवी उंची गाठेल," असे मोदी यांनी म्हटले. भाजप प्रदेशाध्यक्ष संजय सरावगी यांनीही चौधरी यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा विकास वेगाने होईल, असे सांगितले.


सम्राट चौधरी यांनी १९९० मध्ये राजकीय प्रवासाला सुरुवात केली. राबडी देवी यांच्या सरकारमध्ये १९९९ मध्ये त्यांनी कृषी मंत्री म्हणून काम केले. त्यानंतर लालू प्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलपासून दूर होत त्यांनी जनता दल (युनायटेड) मध्ये प्रवेश केला.

## अभिनेता विजयला पाहण्यासाठी अभूतपूर्व गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोयंबतूर** : अभिनेता विजय यांच्या निवडणूक प्रचाराच्या पार्श्वभूमीवर शहरात करण्यात आलेल्या वाहतूक बदलांमुळे प्रमुख मार्गांवर मोठ्या प्रमाणात कोंडी निर्माण झाली. पोलिसांनी त्यांच्या ताफ्यासाठी विशेष मार्ग मोकळा ठेवण्यासाठी जी. डी. नायडू उड्डाणपुलावरील वाहतूक मर्यादित केल्याने अविनाशी रस्त्यावर सुमारे १० किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

विमानतळ चौक, सिडको, नीलमबूर ते करुमथंपट्टी या मार्गावर वाहतूक पूर्णपणे विस्कळीत



झाली होती. या कोंडीत अनेक १०८ रुग्णवाहिका अडकल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली. विजय यांचा ताफा तिरुप्पूरच्या दिशेने रवाना झाल्यानंतरही वाहतूक सुरळीत होण्यासाठी जवळपास दोन तास लागले. विजय दुपारी सुमारे दीड वाजता अविनाशी येथे पोहोचले. त्यानंतर ते चेन्नईहून खाजगी जेटने तिरुप्पूर जिल्ह्यातील पेरुमनल्लूरकडे रवाना झाले. विमानतळाबाहेर ते खुल्या वाहनातून समर्थकांना अभिवादन करताना दिसले. मोठ्या संख्येने जमलेल्या चाहत्यांमुळे पोलिसांना बॅरिकेड्स उभारून गर्दी नियंत्रणात ठेवावी लागली, तरीही अनेक जण अडथळे ओलांडून पुढे येत होते.

या दौऱ्यादरम्यान वाहतूक वळवण्यात आल्याने बससेवा आणि नागरिकांनाही मोठा फटका बसला. अविनाशी रस्त्यावरून सिंगनल्लूर आणि तिरुप्पूरकडे जाणाऱ्या बसेस तसेच अवजड वाहनांना लक्ष्मी मिल्समार्गे पुलियाकुलम आणि त्रिची रस्त्याकडे वळवण्यात आले. परिणामी पीलमेडू आणि होप्स परिसरातील बस प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला.

## गुजरातमध्ये कामगारांचा आंदोलनाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अहमदाबाद** : गुजरातमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत काम करणाऱ्या कामगारांना गेल्या पाच ते सहा महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले असून, थकीत रक्कम तात्काळ न दिल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा कामगार संघटनांनी दिला आहे.

सुरुवातीला पेमेंटमध्ये होणारा विलंब हा किरकोळ मुद्दा मानला जात होता; मात्र आता तो मोठ्या संकटात परिवर्तित झाला आहे. विखुरलेल्या तक्रारींपासून सुरू झालेला हा प्रश्न आता राज्यव्यापी पातळीवर गंभीर झाला असून, सौराष्ट्रातील उना आणि गिरगढा या भागांमध्ये परिस्थिती अधिकच बिकट असल्याचे समोर आले आहे. योजनेअंतर्गत काम करणाऱ्या मजुरांचा दावा आहे की, सतत काम करूनही त्यांना अनेक महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. याबाबत ऑल गुजरात मनरेगा एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष राकेश कुमार यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. "हा केवळ विलंब नाही, तर प्रशासकीय व्यवस्थापन आणि निधी नियोजनातील गंभीर त्रुटीचे द्योतक आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. वेतन रखडल्यामुळे कामगारांच्या कुटुंबांवर मोठा आर्थिक ताण आला असून, अनेकांना दैनंदिन गरजा भागवण्यासाठी कर्ज घ्यावे लागत आहे. ग्रामीण भागात अन्न, शिक्षण आणि आरोग्याच्या गरजाही पूर्ण करणे कठीण होत असल्याचे चित्र आहे.

सौराष्ट्रातील अनेक गावांमध्ये कामगारांनी जीवनावश्यक खर्चात कपात केली असून, कर्जाच्या आधारावर घरखर्च चालवावा लागत आहे. वेतनाचा विलंब जितका वाढत जाईल, तितकी आर्थिक परिस्थिती अधिकच गंभीर होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## मतदारसंघ पुनर्रचनेवरून तामिळनाडूत संताप

# हा तर ऐतिहासिक अन्याय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : एम. के. स्टॅलिन यांनी केंद्र सरकारच्या प्रस्तावित मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेवर टीकेची धार अधिक तीव्र करत या निर्णयाला दक्षिणेकडील राज्यांवरील "ऐतिहासिक अन्याय" असे संबोधले आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ गुरुवारी राज्यभर काळे झेंडे फडकावून आंदोलन करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

प्रस्तावित परिसीमन दुरुस्तीवर बोलताना स्टॅलिन यांनी प्रश्न उपस्थित केला की, भारताच्या प्रगतीत मोठे योगदान देणाऱ्या दक्षिणेकडील राज्यांना यामुळे शिक्षा दिली जात आहे का. या प्रक्रियेमुळे संपूर्ण दक्षिण भारतात संतापाची लाट निर्माण झाल्याचा इशाराही त्यांनी दिला. या पार्श्वभूमीवर त्यांनी द्रविड मुनेत्र कळघमच्या खासदारांची तातडीची बैठक घेऊन पुढील रणनीती निश्चित केली.

सोशल मीडियावर त्यांनी केलेल्या वक्तव्यात, "हा पक्ष किंवा व्यक्तींचा मुद्दा नसून लोकांच्या हक्कांचे रक्षण करण्याचा प्रश्न आहे. देशभरातील सर्व पक्षांनी लोकशाही वाचवण्यासाठी एकत्र यावे," असे



आवाहन त्यांनी केले. त्यांनी केंद्रातील भारतीय जनता पार्टी सरकारवर थेट निशाणा साधत हा निर्णय लोकशाही आणि राज्यांच्या अधिकारांवरचा हल्ला असल्याचा आरोप केला.

दरम्यान, केंद्र सरकारने २०११ च्या जनगणनेच्या आधारे मतदारसंघांची पुनर्रचना करून लोकसभा सदस्यसंख्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव मांडला आहे. हा प्रस्ताव महिलांसाठी एक-तृतीयांश आरक्षणाच्या अंमलबजावणीशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, दक्षिणेकडील राज्यांवर याचा विपरीत परिणाम होईल, अशी भीती स्टॅलिन यांनी व्यक्त केली.

स्टॅलिन यांनी आरोप केला की, १६ एप्रिलपासून बोलावण्यात आलेले संसदेचे विशेष अधिवेशन हे तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमधील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर "घाईघाईने" बोलावण्यात आले आहे आणि या अधिवेशनात केंद्र सरकार ही घटनादुरुस्ती रेटून मंजूर करून घेण्याचा प्रयत्न करणार आहे.

"भाजप आगीशी खेळत आहे. जर केंद्राने तामिळनाडूच्या आवाजाकडे दुर्लक्ष केले, तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील," असा इशाराही त्यांनी दिला. तसेच, या निर्णयाविरोधात तामिळनाडूत मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभारले जाईल, असे स्पष्ट करत "राज्याच्या हक्कांसाठी आम्ही ठामपणे उभे राहू," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

## महिला आरक्षणात उप-कोटा द्या : मायावती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ** : मायावती यांनी लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी प्रस्तावित ३३ टक्के आरक्षणांतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय महिलांसाठी स्वतंत्र उप-आरक्षणाचा समावेश करावा, अशी ठाम मागणी केली आहे. या उप-कोट्याशिवाय आरक्षणाचा उद्देश बहुतांश निष्फळ ठरू शकतो, असा इशाराही त्यांनी दिला.

पत्रकारांशी संवाद साधताना बहुजन समाज पक्ष प्रमुख मायावती



म्हणाल्या की, महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाचे त्यांचा पक्ष स्वागत करतो; मात्र वंचित घटकांसाठी स्वतंत्र तरतूद नसल्यास त्याचा अपेक्षित लाभ मिळणार नाही. केंद्र सरकारने या विषयावर विशेष अधिवेशन बोलावले असले तरी, दुर्बल घटकांतील महिलांना खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व मिळेल का, याबाबत त्यांनी शंका व्यक्त केली.

त्या म्हणाल्या की, त्यांच्या पक्षाची भूमिका दीर्घकाळापासून स्पष्ट असून लोकसंख्येच्या प्रमाणात महिलांना ५० टक्के आरक्षण द्यावे, तसेच त्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय महिलांसाठी स्वतंत्र कोटा असावा. मात्र, विविध राजकीय पक्षांनी "हितसंबंध आणि अडचणींमुळे" या मागणीला अपेक्षित पाठिंबा दिला नाही, असा आरोप त्यांनी केला. २०२३ मध्ये केंद्रातील भारतीय जनता पार्टी सरकारने महिला आरक्षण विधेयक मांडले तेव्हा देखील, उप-कोट्याची तरतूद केल्यास या विधेयकाला पूर्ण पाठिंबा देऊ, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली होती. महिलांच्या सक्षमीकरणाकडे केवळ राजकीय दृष्टिकोनातून न पाहता सुरक्षितता, सन्मान आणि सामाजिक उन्नतीच्या दृष्टीने पाहणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

सध्याच्या परिस्थितीत धोरणात्मक स्पष्टतेचा आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याने महिलांवरील अन्याय, जातीय भेदभाव आणि शोषणाच्या घटना कायम असल्याचे त्यांनी नमूद केले.

## सहा बांगलादेशी दरोडेखोरांना अटक

**नवी दिल्ली** : अनेक राज्यांमध्ये हिंसक दरोडे आणि हत्या करणाऱ्या आणि गुन्हे करण्याच्या मधल्या वेळेत शेजारच्या देशात पळून जाणाऱ्या बांगलादेशस्थित दरोडेखोरांच्या टोळीच्या सहा कथित सदस्यांना, सराई काले खानजवळ दिल्ली पोलिसांच्या जवानांसोबत झालेल्या मध्यरात्रीच्या चकमकीनंतर अटक करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ही टोळी भारतभरातील स्थानिक संपर्क आणि नातेवाईकांच्या जाळ्यावर अवलंबून होती.

## दिल्ली–देहरादून द्रुतगती महामार्गामुळे विकासाला चालना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : दिल्ली–देहरादून द्रुतगती मार्गामुळे पश्चिम उत्तर प्रदेशातील आर्थिक, औद्योगिक आणि पायाभूत विकासाला मोठी गती मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

सुमारे २१० किमी लांबीच्या या आधुनिक द्रुतगती मार्गामुळे दिल्ली ते देहरादून प्रवासाचा कालावधी सहा तासांवरून सुमारे अडीच तासांपर्यंत कमी झाला आहे.

या मार्गामुळे बागपत, बरौत, शामली आणि सहारनपूरसारख्या शहरांना थेट फायदा होणार असून, या भागांमध्ये उद्योग, व्यापार आणि रिअल इस्टेट क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सुधारलेल्या संपर्क व्यवस्थेमुळे मालवाहतूक जलद होईल आणि लॉजिस्टिक्स खर्च कमी होईल, ज्याचा सकारात्मक परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर होईल. तसेच हा द्रुतगती मार्ग दिल्ली-मुंबई, दिल्ली-कात्रा आणि दिल्ली-मेरठ अशा प्रमुख मार्गांशी जोडला जाणार असल्याने संपूर्ण उत्तर भारतातील वाहतूक साखळी अधिक सक्षम होणार आहे.

पर्यटन क्षेत्रालाही याचा मोठा फायदा अपेक्षित असून, देहरादून व आसपासच्या पर्यटनस्थळांकडे जाणे अधिक सुलभ होणार आहे. यामुळे स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. पश्चिम उत्तर प्रदेशातील सर्वांगीण विकासाचा तो महत्त्वाचा पाया ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.


## कृषी क्षेत्रासमोर बहुआयामी आव्हाने

# कमी पावसामुळे शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : हवामान खात्याने कमी पावसाची शक्यता, एल निनो परिस्थितीचा संभाव्य उदय आणि पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षामुळे खतांच्या पुरवठ्यात निर्माण होणारे धोके यांमुळे भारताच्या कृषी क्षेत्रास आगामी आर्थिक वर्षात गंभीर अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

भारतीय हवामान विभागने २०२६ च्या नैऋत्य मान्सूनसाठी जाहीर केलेल्या पहिल्या दीर्घकालीन अंदाजानुसार, देशात दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्के (±५%) पाऊस पडण्याची शक्यता आहे. हा अंदाज सामान्यपेक्षा कमी



मान्सूनकडे निर्देश करणारा असून, गेल्या किमान २५ वर्षांतील सर्वात कमी प्रारंभिक अंदाज मानला जात आहे. याउलट २०२४ आणि २०२५ मध्ये मान्सून सामान्यपेक्षा जास्त होता. अहवालात नमूद केल्याप्रमाणे, सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमानाचा थेट परिणाम खरीप हंगामावर होण्याची शक्यता आहे. जून ते सप्टेंबरदरम्यान मान्सूनवर अवलंबून असलेल्या पिकांच्या पेरणीवर परिणाम होऊन उत्पादन, शेतकऱ्यांचा रोख प्रवाह आणि अन्नधान्याच्या किमती यावर दबाव येऊ शकतो. याशिवाय, कमी पावसामुळे जलाशयांचे पुनर्भरणही मर्यादित राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जागतिक हवामान संस्थांच्या अंदाजानुसार, जून ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत एल निनो स्थिती निर्माण होण्याची सुमारे ६२ टक्के शक्यता आहे. या परिस्थितीमुळे भारतातील मान्सूनवर विपरीत परिणाम होऊन पिकांच्या उत्पादनात घट येण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. खतांच्या उपलब्धतेबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली असून, पश्चिम आशियातील संघर्षामुळे कच्चा माल आणि तयार खतांच्या पुरवठा साखळीत अडथळे निर्माण होऊ शकतात. त्यामुळे देशांतर्गत उत्पादनावर परिणाम होऊन पर्यायी आयातीवर अवलंबून राहण्याची गरज भासू शकते. आर्थिक वर्ष २०२७ साठी कृषी सकल मूल्यवर्धित वाढ ३ टक्क्यांपर्यंत राहील, असा अंदाज वर्तवताना त्यात नकारात्मक धोके असल्याचे स्पष्ट केले आहे. संभाव्य अन्नधान्य महागाईमुळे ग्राहक किंमत निर्देशांक ४.५ टक्क्यांपेक्षा जास्त राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

तथापि, देशातील जलाशयांमधील तुलनेने समाधानकारक पाणीसाठा काही प्रमाणात दिलासा देणारा ठरत आहे. २ एप्रिल २०२६ पर्यंत अखिल भारतीय जलाशय साठा कार्यक्षमतेच्या ४७ टक्क्यांपर्यंत पोहोचला असून, तो गेल्या वर्षीच्या ४० टक्के आणि दशकातील सरासरी ३७ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. यामुळे कमकुवत मान्सूनचा काही अंशी परिणाम कमी होण्यास मदत होऊ शकते.

शेतकऱ्यांचा आत्मविश्वास टिकवण्यासाठी खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत योग्य वाढ करणे गरजेचे असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. तसेच, पावसाचे प्रमाण कमी असले तरी त्याचे भौगोलिक आणि कालावधीतील समसमान वितरण झाल्यास परिणाम मर्यादित राहू शकतो.